**CNR.NO. MHNB080012712024**

**सं.फौ. ख. क्र.७१२/२०२४**

**सरकार वि. प्रविण कांतीलाल पाटील**

**निशाणी क्र. ०८ पुढे**

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांकः १२ ऑगस्ट, २०२६)

अभियोगपक्षातर्फे विशेष सहा. सरकारी अभियोक्ता आरती बेलोणकर व आरोपीतर्फे विधीज्ञ विलेंद्र वसावे यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. अभियोगपक्षाची खटला व आरोपीचा बचाव या अनुषंगाने खालील नमुद मुद्दे निर्णीत करण्याकरिता उपस्थित झाले आहेत व मी माझा निष्कर्ष या खालील दिलेल्या कारणांकरिता पुढील प्रमाणे देत आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०२.०७.२०२४ रोजी १७.०० वाजेच्या सुमारास मौजे खांडबारा गावात बाजार पेठेत आरोपी प्रविण कांतीलाल पाटील हा एका घराच्या आडोश्याला बेकायदेशीररित्या तीन काळया रंगाचे मोटारीचे ट्युबमध्ये प्रत्येकी ५० लिटर अशी एकुण १५० लिटर गावठी हातभट्टी दारु रक्कम रुपये १५,०००/-,असा मुद्देमाल बाळगतांनामिळून आलात आणि त्याद्वारे कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी कायद्यांन्वये गुन्हा केल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय? | नाही. |

| | | |
|---|---|---|
| २. | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |

## <u>कारणमिमंसा</u>

०२. अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द दोषारोप सिध्द करणेकामी फिर्यादी साक्षीदार क्र ३ राजेंद्र चिंतामण काटके यांची साक्ष, पंच साक्षीदार क्र.१ नरेंद्र दिलीप ईशी आणि पंच साक्षीदार क्र.२ करण चंदा पिंपळे यांची साक्ष अनुक्रमे निशाणी क्र. ०८ नोंदविली. प्रस्तुत प्रकरणात फिर्याद (निशाणी क्र १३) व घटनास्थळ पंचनामा (निशाणी क्र १४) हे दस्त फिर्यादी साक्षीदाराने शाबीत केलेले आहेत. इतर साक्षीदारांना वारंवार समन्स व वॉरंट काढुन देखील ते साक्षीकामी प्रकरणात हजर झाले नाही. निशाणी क्र १ वरील आदेशाप्रमाणे सरकार पक्षाचा पुरावा बंद करण्यात आला.

### <u>मुद्दा क्रमांक १ करिताः</u>

०३. कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम नुसार गुन्हा शाबित होण्याकरिता एक महत्वाचा घटक म्हणजे अफिम व्यतिरिक्त मादक द्रव्ये किंवा भांग प्रत्येक्षात ताब्यात असणे व विक्री करणे. त्यामुळे अशा प्रकारचे मादक द्रव्य आरोपीचे ताब्यातुन मिळुन आले हे सिध्द करण्याचे दायित्व व जबाबदारी अभियोगपक्षावर आहे.

०४. फिर्यादी साक्षीदार क्र. ३ राजेंद्र चिंतामण काटके यांचे साक्षीत असे आले आहे की, दिनांक ०२.०७.२०२४ रोजी ते स्थानिक गुन्हे शाखा नंदुरबार येथे कार्यरत होते. सदर दिवशी पोनि खेडकर यांना गुप्त बातमीदारीमार्फत माहिती मिळाली होती की, मौजे खांडबारा गावात बाजारपेठेत एका घराच्या आडोश्याला एक इसम बेकायदेशीररित्या गावठी हातभट्टी

दारुची चोरटी अवैध विक्री करीत असल्याचे समजले. सदर माहिती प्रमाणे ते पोलिस स्टॉपसह खांडबारा दुरक्षेत्र येथे आले. तेथे राकेश वसावे यांनी दोन पंचांना बोलावले होते. त्यानंतर ते पंचासह बातमीच्या ठिकाणी गेले. तेथे त्यांनी १७.०० वाजता छापा टाकला. त्यानंतर त्यांनी त्याला त्याचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव प्रविण कांतीलाल पाटील असे सांगितले. त्यानंतर त्याच्या ताब्यातुन तीन मोटारीचे ट्युबमधुन १५० लिटर गावठी हातभट्टी दारु रक्कम रुपये १५,०००/– मिळुन आली. त्यानंतर जप्त मुद्देमालामधुन एक १८० मि.ली. बाटली नमुना रासायनिक अहवालाकरीता शिललाख केली. त्यानंतर राकेकश वसावे यांनी पंचनामा केला होता व उर्वरीत मुद्देमाल जागीच नाश केला होता. त्यानंतर ते आरोपीला व जप्त मुद्देमाल घेऊन पोलिस ठाण्यात आले व त्यांनी आरोपी विरुध्द तक्रार दाखल केली.प्रस्तुत साक्षीदाराने उलटतपासादरम्यान बातमीचे खात्रीसाठी बनावट ग्राहक पाठविला नसल्याची बाब मान्य केली आहे, घटनास्थळ हे वर्दळीचे ठिकाण असल्याचे तसेच त्यांना घटनास्थळावरील घराचा क्रमांक त्यांना सांगता येणार नसल्याची बाब मान्य केली आहे. तसेच, आरोपीतर्फे विचारण्यात आलेले इतर सुचक प्रश्नांना नकारलेले आहे.

०५. साक्षीदार क्र १ नरेंद्र दिलीप ईशी आणि पंच साक्षीदार क्र.२ करण चंदा पिंपळे हे प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार असून त्यांनी त्याचे साक्षीत असे सांगितले आहे की, ते पोलीसासोबत कोठेहे गेले नव्हते. पोलिसांनी त्यांच्या एका कागदावर सही घेतली होती. पोलिसांनी त्यांच्यासमक्ष काहीही जप्त केले नाही. पंचनाम्यातील मजकुर त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. प्रस्तुत साक्षीदाराने त्यांचे समक्ष पंचनामा झाला नसल्याचे मान्य केल्यामुळे जप्त मुद्देमाल आरोपीचेच ताब्यातुन जप्त केला ही बाब शाबित करणेसाठी स्वतंत्र साक्षीदारांचा जबाब देखील नोंदविलेला नाही. त्यामुळे आरोपीचेच ताब्यातुन मुद्देमाल जप्त केला होता ही बाब सिध्द करणेस अभियोगपक्षास अपयश आलेले आहे.

०६. सदरील प्रकरणात अभियोगपक्षास पुरेशी संधी देऊनही तपासी अंमलदार व कार्यवाही वेळी हजर असलेले इतर पोलीस साक्षीदार यांची साक्ष देखील नोंदविलेली नाही.

अजुन असे की, अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार क्र. ३ या व्यतिरिक्त इतर साक्षीदाराही पोलीस साक्षीदार आहेत. त्यामुळे स्वतंत्र साक्षीदार असलेले साक्षीदार क्र. १ व २ यांनी अभियोगपक्षास सहकार्य केलेले नाही. त्यामुळे जरी अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासले असलेतरी या साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे गुन्हा शाबित होऊ शकत नाही. प्रस्तुत प्रकरणात रासायनिक विष्लेषन अहवाल (निशाणी १५) अभिलेखावर दाखल आहे. सदर अहवालाचे अवलोकन केले असता त्यामध्ये जप्त मुद्देमाल वैद्यकीय, निर्जंतुकीकरण अथवा बाथरुम निर्जंतुक म्हणुन वापरण्यात येणारा रसायन नसल्याचे व व सदर अहवालाअंती जप्ती केलेला मुद्देमाल नमुना मध्ये १० टक्के पाण्यात इथिल अल्कोहोल असल्याचे नमुद केलेले आहे. परंतु जप्त मुद्देमाल हा दिनांक ०२.०७.२०२४ रोजी जप्त करण्यात आला होता. त्यानंतर दिनांक २७.०८.२०२४ रोजी प्रयोगशाळेत तपासणीकामी पाठवण्यात आला. त्यामुळे जप्त मुद्देमाल हा तपासणीकामी एक महिना सव्वीस दिवस कशा परिस्थितीत ठेवला होता, याचे स्पष्टीकरण अभिलेखावर आले नाही. त्यामुळे जरी अभियोगपक्षातर्फे इतर साक्षीदार तपासले असले तरी आरोपी हा बेकायदेशीर रित्या दारु विक्री करत होता व त्याचे ताब्यातुन मुद्देमाल जप्त केला होता ही बाब संशयाचे पलिकडे जाऊन सिध्द करणेस अभियोगपक्षास अपयश आलेले आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर मी नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्रमांक २ करिताः**

०७. यापूर्वीच मुद्दा क्र. १ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेला साक्षीपुरावा आरोपी याने गुन्हा केला असे सिध्द करित नाही. आरोपी हा दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी **प्रविण कांतीलाल पाटील** यांची भारतीय नागरीक सुरक्षा संहितेचे कलम २७८(१) प्रमाणे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम |

| | |
|---|---|
| | ६५(ई) चे आरोपा मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचे वयैक्तीक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येते. |
| ३ | प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुद्देमाल जागीच नाश केल्यामुळे मुद्देमालाबाबत आदेश नाही. |
| ४ | आरोपीने भारतीय नागरीक सुरक्षा कलम ४८१ प्रमाणे रक्कम रु.१५,०००/– वैयक्तीक बंधपत्र सादर करावा.<br>(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). |

Digitally signed by DEORE DHANANJAY SHIVAJI
Date: 2026.08.13 18:22:28 +0530

ठिकाण – नवापुर. **(धनंजय एस. देवरे)**

दिनांक –१२.०८.२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कोर्ट क्र. २,

नवापुर.

**<u>दा ख ला</u>**

दाखला देण्यात येतो की, सदर पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | :— | मयुर डी. पाटील |
| न्यायालयाचे नाव | :— | दिवाणी व फौजदारी न्यायालय, नवापुर, ता. नवापुर, जि. नंदूरबार. |
| आदेश जाहीर केल्याची तारीख | :— | १२/०८/२०२६ |
| न्यायाधिशांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | :— | १२/०८/२०२६ |
| आदेश अपलोड केल्याची तारीख | :— | १३/०८/२०२६ |